रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

प्राधिकृत प्रकाशन

गुरुवार, ऑक्टोबर २७, २००५/कार्तिक ५, शके १९२७

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार-अ

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

टीप.—प्रत्येक अधिसूचनेच्या आधी डावीकडील कोपऱ्यात जे ठळक आकडे छापलेले आहेत ते ह्या साप्ताहिक राजपत्रात छापलेल्या अधिसूचनांचे अनुक्रमांक आहेत.

### महिला व बाल विकास विभाग

नवीन प्रशासन भवन, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १८ ऑक्टोबर २००५.

### अधिसूचना

भारताचे संविधान.

क्र.एमबीए. २००३/सीआर-३२/डी-७.— भारताचे संविधान याच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून आणि त्याबाबतीत करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश व संलेख यांचे अधिक्रमण करून महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, महाराष्ट्र शासनाच्या महिला व बाल विकास विभागाच्या नियंत्रणाखालील महिला व बाल विकास आयुक्तालयातील गट-'क' मधील "कार्यालय अधीक्षक / जिल्हा परीविक्षा अधिकारी / अधीक्षक / निरीक्षक प्रमाणित शाळा व संस्था (कनिष्ठ) / मुख्य अधिकारी / प्रभारी अधिकारी / कार्यकारी सचिव / परीविक्षा अधिकारी / उप अधीक्षक / सहायक निरीक्षक,





[किंमत : रुपये ५.००]

Scanned with CamScanner

प्रमाणित शाळा / अधीक्षक / प्रमुख लिपिक / वरिष्ठ लिपिक (सहायक), मुख्य सेविका / वरिष्ठ लिपिक व सांख्यिकी सहायक " या पदांवरील सेवाप्रवेशाचे विनियमन करणारे पुढील नियम करीत आहेत :—

१. या नियमांना, महिला व बाल विकास सेवांतील गट-'क' मधील कार्यालय अधीक्षक / जिल्हा परीविक्षा अधिकारी / अधीक्षक / निरीक्षक प्रमाणित शाळा व संस्था (कनिष्ठ) / मुख्य अधिकारी / प्रभारी अधिकारी / कार्यकारी सचिव / परीविक्षा अधिकारी / उप अधीक्षक / सहायक निरीक्षक प्रमाणित शाळा / अधीक्षक / प्रमुख लिपिक / वरिष्ठ लिपिक (सहायक), मुख्य सेविका / वरिष्ठ लिपिक व सांख्यिकी सहायक (सेवाप्रवेश) नियम, २००५ असे म्हणावे.

२. या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) "आयुक्त" याचा अर्थ, महिला व बाल विकास आयुक्त असा आहे,

(ख) "आयुक्तालय" याचा अर्थ, महिला व बाल विकास आयुक्तालय असा आहे,

(ग) "पदवी" याचा अर्थ, सांविधिक विद्यापीठाची पदवी असा आहे,

(घ) "विभाग" याचा अर्थ, महाराष्ट्र शासनाचा महिला व बाल विकास विभाग असा आहे,

(ङ) "शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन असा आहे,

(च) "माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा" याचा अर्थ, महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे अधिनियम, १९६५ अन्वये विभागीय मंडळाने घेतलेली माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा असा आहे आणि त्यामध्ये त्यास समकक्ष म्हणून शासनाने घोषित केलेल्या इतर कोणत्याही परीक्षेचा समावेश होतो.

३. आयुक्तालयातील कार्यालय अधीक्षक, गट-क या पदावरील नियुक्ती एकतर,—

(क) आयुक्तालयातील गट-क मधील अधीक्षकाचे / प्रमुख लिपिकाचे किंवा वरिष्ठ लिपिक (सहायक) चे पद धारण करणाऱ्या व त्या पदावर तीन वर्षांहून कमी नसेल इतकी नियमित सेवा करणाऱ्या व्यक्तींमधून योग्यतेच्या अधिनतेने व ज्येष्ठतेच्या आधारे, योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीद्वारे करण्यात येईल, किंवा

(ख) राज्य शासनाच्या सेवेतील समतुल्य पद धारण करणाऱ्या योग्य व्यक्तीच्या बदलीद्वारे करण्यात येईल.

४. आयुक्तालयातील गट-क मधील अधीक्षक / प्रमुख लिपिक / वरिष्ठ लिपिक (सहायक) पदावरील नियुक्ती एकतर,—

(क) आयुक्तालयातील गट-'क' मधील वरिष्ठ लिपिकाचे किंवा सांख्यिकी सहायकाचे पद धारण करणाऱ्या व त्या संवर्गात तीन वर्षांहून कमी नसेल इतकी नियमित सेवा करणाऱ्या व्यक्तींमधून योग्यतेच्या अधीनतेने व ज्येष्ठतेच्या आधारे, योग्य व्यवतीच्या पदोन्नतीद्वारे करण्यात येईल, किंवा

(ख) राज्य शासनाच्या सेवेतील समतुल्य पद धारण करणाऱ्या योग्य व्यक्तीच्या बदलीद्वारे करण्यात येईल.

Scanned with CamScanner

५. आयुक्तालयातील गट-'क' मधील जिल्हा परीविक्षा अधिकारी / अधीक्षक (संस्था) / निरीक्षक प्रमाणित शाळा व संस्था (कनिष्ठ) / मुख्य अधिकारी / प्रभारी अधिकारी / कार्यकारी सचिव या पदांवरील नियुक्ती एकतर,—

(क) आयुक्तालयातील गट-'क' मधील परीविक्षा अधिकारी / उप अधीक्षक किंवा सहायक निरीक्षक प्रमाणित शाळा पद धारण करणाऱ्या व त्या संवर्गामध्ये तीन वर्षाहून कमी नसेल इतकी नियमित करणाऱ्या व्यक्तींमधून योग्यतेच्या अधीनतेने व ज्येष्ठतेच्या आधारे, योग्य व्यक्तींच्या पदोन्नतीद्वारे करण्यात येईल, किंवा

(ख) राज्य शासनाच्या सेवेतील समतुल्य पद धारण करणाऱ्या योग्य व्यक्तीच्या बदलीद्वारे करण्यात येईल.

६. आयुक्तालयातील गट-'क' मधील परीविक्षा अधिकारी / उप अधीक्षक किंवा सहायक निरीक्षक प्रमाणित शाळा या पदांवरील नियुक्ती एकतर,—

(क) आयुक्तालयातील गट-'क' मधील मुख्यसेविका पद धारण करणाऱ्या व त्या संवर्गात तीन वर्षाहून कमी नसेल इतकी नियमित सेवा करणाऱ्या योग्यतेच्या अधीनतेने व ज्येष्ठतेच्या आधारे योग्य व्यक्तींच्या पदोन्नतीद्वारे करण्यात येईल, किंवा

(ख) आयुक्तालयातील गट-'क' मधील वरिष्ठ लिपिकाचे किंवा सांख्यिकी सहायकाचे पद धारण करणाऱ्या व त्या संवर्गात पाच वर्षाहून कमी नसेल इतकी नियमित सेवा करणाऱ्या व्यक्ती मर्यादित विभागीय परिक्षेच्या निकालाच्या आधारे तयार केलेल्या गुणवत्ता यादीतील गुणवत्तेच्या आधारे योग्य व्यक्तींच्या निवडीद्वारे करण्यात येईल, आणि ज्यांनी नामनिर्देशनाद्वारे करावयाच्या नियुक्तीसाठी या नियमाच्या पोट-नियम (ग) च्या खंड (दोन) मध्ये नमूद केलेली अर्हता धारण केली असेल अशा व्यक्ती, अशा मर्यादित विभागीय परीक्षेकरिता पात्र असतील, किंवा

(ग) (एक) ज्यांचे वय तेहतीस वर्षापेक्षा अधिक नसेल :

परंतु, शासनाच्या सेवेत अगोदरच कार्यरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, वयोमर्यादा दहा वर्षापर्यंत शिथिल करता येईल, आणि

(दोन) ज्यांनी कला किंवा विज्ञान किंवा वाणिज्य किंवा कृषी किंवा विधी किंवा समाजकार्य किंवा गृह विज्ञान किंवा पोषाहार यांमधील पदवी किंवा त्यास समतुल्य म्हणून शासनाने घोषित केलेली इतर कोणतीही अर्हता धारण केली असेल,

अशा उमेदवारांमधून, नामनिर्देशनाद्वारे करण्यात येईल, किंवा

(घ) राज्य शासनाच्या सेवेतील समतुल्य पदावरील योग्य व्यक्तींच्या बदलीद्वारे करण्यात येईल.

Scanned with CamScanner

७. आयुक्तालयातील मुख्य सेविका, गट-'क' पदावरील नियुक्ती एकतर,—

(क) ज्यांचे वय पंचावन्न वर्षांपेक्षा अधिक नसेल, आणि ज्यांनी मानसेवी 'अंगणवाडी सेविका' म्हणून दहा वर्षांहून कमी नसेल इतका अनुभव धारण केला असेल आणि ज्यांनी माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण केली असेल, अशा आयुक्तालयातील मानसेवी अंगणवाडी सेविकांमधून योग्य व्यक्तींच्या निवडीद्वारे करण्यात येईल, किंवा

(ख) (एक) ज्यांचे वय तेहतीस वर्षांहून अधिक नसेल, आणि

(दोन) ज्यांनी कला किंवा विज्ञान किंवा वाणिज्य किंवा कृषी किंवा विधी किंवा समाजकार्य किंवा गृह विज्ञान किंवा पोषाहार किंवा त्यास समतुल्य म्हणून शासनाने घोषित केलेली इतर कोणतीही अर्हता धारण केली असेल,

अशा उमेदवारांमधून, नामनिर्देशनाद्वारे करण्यात येईल :

परंतु, एकात्मिक बाल विकास सेवा योजनेमधील प्रकल्पांमध्ये मानसेवी अंगणवाडी सेविका म्हणून दहा वर्षांहून कमी नसेल इतकी सेवा करणाऱ्या व पंचेचाळीस वर्षांहून अधिक वय नसणाऱ्या व्यक्ती, नामनिर्देशनाद्वारे करावयाच्या नियुक्तीसाठी पात्र समजण्यात येईल.

८. आयुक्तालयातील गट-'क' मधील वरिष्ठ लिपिक किंवा सांख्यिकी सहायक या पदावरील नियुक्ती एकतर,—

(क) आयुक्तालयातील गट 'क' मधील कनिष्ठ लिपिक किंवा कनिष्ठ सहायक या संवर्गातील पद धारण करणाऱ्या व त्या संवर्गात तीन वर्षांहून कमी नसेल इतकी नियमित सेवा करणाऱ्या व्यक्तींमधून योग्यतेच्या अधीनतेने व ज्येष्ठतेच्या आधारे योग्य व्यक्तींच्या पदोन्नतीद्वारे करण्यात येईल, किंवा

(ख) (एक) ज्यांचे वय तेहतीस वर्षांपेक्षा अधिक नाही : —

परंतु, शासनाच्या सेवेत अगोदरच कार्यरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, वयोमर्यादा दहा वर्षांपर्यंत शिथील करता येईल, आणि

(दोन) ज्यांनी कला किंवा विज्ञान किंवा वाणिज्य किंवा कृषी किंवा विधी किंवा समाजकार्य किंवा गृह विज्ञान किंवा पोषाहार यांमधील पदवी किंवा त्यास समकक्ष म्हणून शासनाने घोषित केलेली इतर कोणतीही अर्हता धारण केली असेल,

अशा उमेदवारांमधून, नामनिर्देशनाद्वारे करण्यात येईल, किंवा

(ग) राज्य शासनाच्या सेवेतील समतुल्य पद धारण करणाऱ्या योग्य व्यक्तींच्या बदलीद्वारे करण्यात येईल.

Scanned with CamScanner

९. (क) नियम ८ मध्ये नमूद केलेले गट 'क' मधील वरिष्ठ लिपिक किंवा सांख्यिकी सहायक या पदांवर पदोन्नतीद्वारे व नामनिर्देशनाद्वारे आणि नियम ७ मध्ये नमूद केलेल्या मुख्यसेविका, गट 'क' या पदांवर निवडीद्वारे आणि नामनिर्देशनाद्वारे करावयाच्या नियुक्त्या ह्या, ५०:५० या गुणोत्तरात करण्यात येतील.

(ख) नियम ६ मध्ये नमूद केलेल्या गट 'क' मधील परीविक्षा अधिकारी, उप अधीक्षक किंवा सहायक निरीक्षक, प्रमाणित शाळा या पदांवर पदोन्नतीद्वारे, निवडीद्वारे व नामनिर्देशनाद्वारे करावयाच्या नियुक्त्या ह्या २५:२५:५० या प्रमाणात करण्यात येतील.

१०. नियम ३ ते ८ मध्ये नमूद केलेल्या कोणत्याही पदांवर नियुक्त केलेल्या व्यक्तीस, मग नियुक्ती पदोन्नतीद्वारे किंवा निवडीद्वारे किंवा बदलीद्वारे किंवा नामनिर्देशनाद्वारे असो, विभागीय परीक्षा आणि त्याबाबतीत करण्यात आलेल्या नियमांनुसार हिंदी भाषा परीक्षा व मराठी भाषा परीक्षा जर त्याने त्या अगोदर उत्तीर्ण केल्या नसतील किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून त्यास सूट मिळालेली नसेल तर, त्या परीक्षा उत्तीर्ण कराव्या लागतील.

११. नियम ३ ते ८ मध्ये नमूद केलेल्या कोणत्याही पदांवर नियुक्त केलेल्या व्यक्तीने, संचालक, महिती व तंत्रज्ञान, महाराष्ट्र शासन यांजकडून वेळोवेळी विहित करण्यात आलेले "संगणक हाताळण्याबाबतचे प्रमाणपत्र" धारण केलेले असले पाहिजे.

१२. नियम ३ ते ८ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त केलेली व्यक्ती महाराष्ट्र राज्यात कोठेही बदली केली जाण्यास पात्र असेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

जी. एम. फोपळणकर,
शासनाचे उप सचिव.

Scanned with CamScanner

महिला व बाल विकास विभाग

नवीन प्रशासन भवन, ३रा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३१ जुलै २०१४

अधिसूचना

भारताचे संविधान.

क्रमांक मबाआ-२०१०/प्र.क्र. १९३/का-७.—भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अ वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे, महाराष्ट्र शासनाच्या महिला व बाल विकास विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील महिल विकास आयुक्तालयामधील महिला व बाल विकास सेवांतील गट-क मधील " कार्यालय अधीक्षक, जिल्हा परिविक्षा अधिकारी, अधीक्षक, प्रमाणित शाळा व संस्था (कनिष्ठ), मुख्य अधिकारी, प्रभारी अधिकारी, कार्यकारी सचिव, परिविक्षा अधिकारी, उप अधीक्षक, सहायक प्रमाणित शाळा, अधीक्षक, प्रमुख लिपिक, वरिष्ठ लिपिक (सहायक), मुख्यसेविका, वरिष्ठ लिपिक व सांख्यिकी सहायक " पदांचे (से नियम, २००५ यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहेत :--

१. या नियमांना, महिला व बाल विकास सेवांतील गट-क मधील " कार्यालय अधीक्षक, जिल्हा परिविक्षा अधिकारी, अधीक्षक, प्रमाणित शाळा व संस्था (कनिष्ठ), मुख्य अधिकारी, प्रभारी अधिकारी, कार्यकारी सचिव, परिविक्षा अधिकारी, उप अधीक्षक, सहायक प्रमाणित शाळा, अधीक्षक, प्रमुख लिपिक, वरिष्ठ लिपिक (सहायक), मुख्यसेविका, वरिष्ठ लिपिक व सांख्यिकी सहायक " (सेवा प्रवेश) ( नियम, २०१३ असे म्हणावे.

२. महिला व बाल विकास सेवांतील गट-क मधील " कार्यालय अधीक्षक, जिल्हा परिविक्षा अधिकारी, अधीक्षक, निरीक्षक शाळा व संस्था (कनिष्ठ), मुख्य अधिकारी, प्रभारी अधिकारी, कार्यकारी सचिव, परिविक्षा अधिकारी, उप अधीक्षक, सहायक निरीक्षक , शाळा, अधीक्षक, प्रमुख लिपिक, वरिष्ठ लिपिक (सहायक), मुख्यसेविका, वरिष्ठ लिपिक व सांख्यिकी सहायक " (सेवा प्रवेश) नियम (यात यानंतर ज्यांचा निर्देश मुख्य नियम असा केला आहे.) यांमध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत.

मुख्य नियमांच्या नियम २ मधील उप नियम (ड) नंतर पुढील उप नियम (च) समाविष्ट करण्यात येईल.—

(च) " उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा " याचा अर्थ महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे अधिनिय (१९६५ चा महा. ४१) यान्वये स्थापन करण्यात आलेल्या विभागीय मंडळाने घेतलेली उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा अ आणि त्यामध्ये शासनाने त्यास समकक्ष म्हणून घोषित केलेल्या इतर कोणत्याही परीक्षेचा समावेश होतो. "

त्या पुढील उप नियम (च) ला, उप नियम (छ) असे नाव देण्यात येईल.

३. मुख्य नियमांचा नियम ६ (ख) मध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात येईल :--

" (ख) मर्यादित विभागीय परीक्षेच्या आधारे तयार केलेल्या गुणवत्ता यादीतील गुणवत्तेच्या आधारे योग्य व्यक्तीच्या निवडीद्वारे येईल. अशा गुणवत्तेच्या आधारे मर्यादित विभागीय परीक्षेकरिता, आयुक्तालयातील गट-क मधील वरिष्ठ लिपिकाचे किंवा सांख्यिकी पद धारण करणाऱ्या व त्या संवर्गातील तीन वर्षाहून कमी नसेल इतकी नियमित सेवा करणाऱ्या आणि कला किंवा विज्ञान किंव किंवा कृषि किंवा विधि किंवा समाजकार्य, किंवा गृह विज्ञान किंवा पोषण आहार यामधील किंवा शासनाने त्यास समकक्ष म्हण केलेली इतर कोणतीही अर्हता धारण करणाऱ्या व्यक्ती, पात्र समजण्यात येतील किंवा "

उप नियम (ग) च्या खंड (दोन) ऐवजी पुढील उपखंड दाखल करण्यात येईल :—

" (दोन) ज्यांनी मानसशास्त्र, समाजशास्त्र, समाजकार्य या विषयांपैकी कोणत्याही विषयामधील पदव्युत्तर पदवी धारण केलेली

४. मुख्य नियमांच्या नियम ७ मध्ये पुढील सुधारणा करण्यात येतील :--

उप नियम (क) ऐवजी पुढील उप नियम दाखल करण्यात येईल,—

Scanned with CamScanner